# पुण्यातून धावणार ४ नव्या वंदे भारत एक्सप्रेस

**पुणे–** पुणेकरांसाठी एक अत्यंत आनंदाची बातमी आहे. लवकरच पुणे शहरातून चार नवीन वंदे भारत एक्सप्रेस गाड्या धावणार आहेत. यामुळे पुण्याहून धावणाऱ्या वंदे भारत गाड्यांची एकूण संख्या सहा होईल. सध्या पुणे-कोल्हापूर आणि पुणे-हुबळी या मार्गांवर वंदे भारत एक्सप्रेस धावत आहेत. रेल्वेने २८ डिसेंबर २०२४ रोजी पुण्यातून आणखी चार नवीन वंदे भारत गाड्या सुरू करण्याची घोषणा केली होती. सद्यस्थितीत पुणे-कोल्हापूर आणि पुणे-हुबळी या दोन मार्गांवर वंदे भारत एक्सप्रेस सेवा देत आहेत. यामध्ये आता आणखी चार गाड्यांची भर पडणार आहे.

वीन वंदे भारत एक्सप्रेस गाड्या पुणे-शेगाव, पुणे-वडोदरा, पुणे-सिकंदराबाद आणि पुणे-बेळगाव या चार मार्गांवर धावतील. पुणे, शेगाव, गुजरात, सिकंदराबाद आणि बेळगाव या शहरांमध्ये प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी असल्याने रेल्वेने हा निर्णय घेतला आहे. याव्यतिरिक्त, रेल्वे पुणे-नागपूर मार्गावर वंदे भारत स्लीपर सुरू करण्याचाही विचार करत आहे. वंदे भारत एक्सप्रेसमुळे प्रवासाचा वेळ तर वाचणारच आहे, शिवाय प्रवाशांना अधिक आरामदायी प्रवास अनुभवता येईल.

**पुणे-शेगाव वंदे भारत एक्सप्रेस**

ही ट्रेन कुठे थांबणार, तिकिट किती असणार याबाबत अद्याप कोणताही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही.

संभाव्य थांबे: दौंड, अहमदनगर, छत्रपती संभाजीनगर, जालना.

तिकीट दर: अद्याप कोणतीही अधिकृत माहिती उपलब्ध नाही.

पुणे-वडोदरा वंदे भारत एक्सप्रेस

संभाव्य थांबे: लोणावळा, पनवेल, वापी, सूरत, वडोदरा.

प्रवासाचा वेळ: सध्याच्या गाड्यांच्या (सुमारे ९ तास) तुलनेत हा वेळ ६-७ तासांपर्यंत कमी होऊ शकतो.

पुणे-सिकंदराबाद वंदे भारत एक्सप्रेस

संभाव्य थांबे: दौंड, सोलापूर, गुलबर्गा, सिकंदराबाद.

प्रवासाचा वेळ: ही सेवा सुरू झाल्यास प्रवासाचा वेळ दोन ते तीन तास वाचू शकतो.

पुणे-बेळगाव वंदे भारत एक्सप्रेस

संभाव्य थांबे: सातारा, सांगली, मिरज, बेळगाव.

अंदाजे तिकीट दर: १५०० ते २००० रुपये.

प्रवासाचा वेळ: प्रवासाचा वेळ दोन ते तीन तासांनी कमी होऊ शकतो. ही ट्रेन पुणे-हुबळी वंदे भारतच्या पर्यायी दिवशी चालवली जाऊ शकते किंवा तिचा विस्तार केला जाऊ शकतो.

**जलद आणि आरामदायक कनेक्टिव्हिटी**

या चार वंदे भारत गाड्या सुरू झाल्यानंतर पुण्याहून शेगाव, वडोदरा, सिकंदराबाद आणि बेळगाव या महत्त्वाच्या ठिकाणांना जलद आणि आरामदायक कनेक्टिव्हिटी मिळेल. या नवीन मार्गांमुळे या शहरांमधील आणि मार्गावरील जोडल्या जाणाऱ्या शहरांतील पर्यटनालाही चालना मिळेल.

# गुहा येथे शेततळ्यात गर्भवती महिलेचा ५ वर्षाच्या मुलासह मृतदेह आढळला

## शवविच्छेदन न करता अंत्यसंस्कार; गुन्हा दाखल

**राहुरी (प्रतिनिधी)–** राहुरी तालुक्यातील गुहा येथील सहा महिन्याची गर्भवती असलेल्या विवाहितेसह ५ वर्षाचा मुलगा शेततळ्यात मृतावस्थेत आढळले. मात्र, घटनेबाबत शासकीय यंत्रणेस माहिती न देता, मृतदेहांचे शवविच्छेन न करता, हिंदू धर्माच्या रितीरिवाजपणे अंत्यसंस्कार विधी न करता मृतदेहाची अप्रतिष्ठा केल्याप्रकरणी पती, सासू, सासरे व नातेवाईकांवर राहुरी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे.

> ▶ संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर तालुक्याचे आमदार रमेश बोरनारे यांनी या घटनेबाबत विधानसभेत तारांकित प्रश्न उपस्थित करून सभागृहाचे लक्ष वेधले व सदर कुटुंबाला तातडीने आवश्यक मदत करावी, अशी मागणी केली.

याबाबत संजय रामभाऊ बारहाते, रा. सडे, ता. कोपरगाव यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हंटले की, दि. ७ जुलै रोजी रात्री फोन आला, त्यावेळी सांगितले की, माझ्या जावयाची बहीण ऋषाली हरिभाऊ कोळसे व मुलगा अंश हे गुहा येथील घराच्या पाठीमागील शेततळ्यामध्ये मयत अवस्थेत मिळुन आले आहे. ऋषाली व मुलगा अंश यांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविले नाहीत तसेच त्यांचे प्रेत घराचे बाहेर असून त्याच स्थीतीमध्ये ठेवुन मृतदेहावर हिंदु धर्माच्या रितीरिवाजाप्रमाणे कोणतेही विधी न करता त्यांच्या प्रेतांची अप्रतिष्ठा केली. त्याच प्रमाणे त्यांच्या मरणाबाबत शासकीय विभागास कळविणे हे गरजेचे असतानाही ऋषाली हिचे सासरे, पती, सासु व इतर नातेवाईकांनी हेतुपरस्पर कळविले नाही, दोन्ही मृतदेहावर गुहा गावातील स्मशनभुमिमध्ये परस्पर अंत्यसंस्कार केले आहेत.

अशी माहिती समजल्यानंतर संजय बारहाते यांनी सोमवार दि. १४ जुलै रोजी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. असून या फिर्यादीवरून राहुरी पोलिस ठाण्यात रवींद्र कोळसे, हरिभाऊ कोळसे, शारदा कोळसे रा. गुहा ता. राहुरी व इतर नातेवाइक यांच्यावर गु.र.न. ७८४ नुसार भारतीय न्याय संहिता ३०१, २११ प्रमाणे दोन्ही मृतदेहाचे शवविच्छेदन न करता, मृतदेहाची अप्रतिष्ठा केली तसेच घटनेबाबत शासकीय यंत्रणेस कळविणे गरजेचे असताना हेतुपरस्पर माहीती न कळविता, परस्पर अत्यसंस्कार केले म्हणुन राहुरी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# अंमली पदार्थांच्या तस्करीत बाल गुन्हेगारांचे वय कमी करण्याबाबत अभ्यास सुरु- फडणवीस

**मुंबई (प्रतिनिधी)–** अमली पदार्थ तस्करीच्या गुन्ह्यातील बाल गुन्हेगारांच्या कायदेशीर संज्ञेतील वयोमर्यादा १६ वरून १४ वर्षापर्यंत कमी करण्याबाबत अभ्यास सुरू असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी विधानसभेत लक्षवेधी सूचनेवरील चर्चेला उत्तर देताना दिली. तसेच अमली पदार्थ तस्करीच्या प्रकरणांमध्ये मकोका कायद्याचा वापर अधिक प्रभावीपणे करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

शिवसेनेचे आमदार विलास भुमरे यांनी छत्रपती संभाजीनगरमधील ड्रग्ज रॅकेटचा मुद्दा उपस्थित करत आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाईची मागणी करणारी लक्षवेधी सूचना आज विधानसभेत मांडली होती. संभाजीनगर ड्रग्जचे हब बनले असून अनेक भागात खुलेआम ड्रग्जची विक्री होत असल्याचे त्यांनी सांगितले. तर शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे आमदार वरुण सरदेसाई यांनी अज्ञान बालकांकडून होणाऱ्या अमली पदार्थांच्या तस्करीचा मुद्दा मांडला. ही मुले कायदेशीरदृष्ट्या सज्ञान नसल्याचा फायदा घेत अंमली पदार्थांच्या तस्करीसाठी जाणीवपूर्वक लहानग्यांच्या वापर होत असल्याचे ते म्हणाले. अशा अज्ञान किंवा विधिसंघर्षित बालकांवर कारवाईसाठी कायद्यात काही बदल केले जातील का, अशी विचारणा सरदेसाई यांनी केली होती.

यावर बोलताना फडणवीस यांनी अज्ञान किंवा विधिसंघर्षित बालकांना ड्रग्ज तस्करीसाठी वापरले जात असल्याचे मान्य केले. त्यामुळे ज्याप्रमाणे बलात्काराच्या प्रकरणांमध्ये आरोपींचे वय कमी करण्यात आले त्याच पद्धतीने ड्रग्ज पेडलिंगमध्ये सहभागी असलेल्या बालकांच्या वयोमर्यादेत बदल करता येईल का, याचा अभ्यास सुरू आहे. अज्ञान बालकांना पकडून त्यांच्यामार्फत हे गुन्हे चालतात. त्यामुळे गुन्ह्याचे स्वरूप पाहून आवश्यक ते बदल केले जातील, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, नायजेरियन नागरिकांकडून होणाऱ्या ड्रग्ज तस्करीबाबत बोलताना फडणवीस म्हणाले, पकडल्यानंतर त्यांना त्यांच्या मायदेशी परत पाठवले जाते. पण अनेकदा ते इथेच राहण्यासाठी ते पुन्हा इतर काही गुन्हे करतात. यावर केंद्र सरकारसोबत चर्चा सुरू असून छोटे गुन्हे मागे घेऊन त्यांना परत पाठवण्यासाठी मानक कार्यप्रणाली तयार केली जात आहे. तसेच जिथे वारंवार अमली पदार्थांचे गुन्हे घडतात तिथे मकोकासारखी कठोर कारवाई झाली पाहिजे. गेल्याच आठवड्यात विधानसभेने एनडीपीएस कायद्यातील बदलांना मंजुरी दिली असून लवकरच हे विधेयक वरच्या सभागृहातही मंजूर होईल. त्यानंतर, वारंवार हा व्यवसाय करणाऱ्यांना मकोका लावला जाईल.

# अवैधरित्या वाळू वाहतूक करणारा टिप्पर पकडला ७ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

## संगमनेर तालुका पोलिसांची कारवाई; चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

**संगमनेर (तालुका प्रतिनिधी)–** संगमनेर तालुका पोलीस ठाण्याच्या पथकाने अवैधरित्या वाळूची वाहतूक करणाऱ्या टिप्परवर कारवाई करत ७ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई मंगळवारी (ता.१५) मध्यरात्री करण्यात आली.

पोलीस निरीक्षक देविदास ढुमणे यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध वाळू वाहतूक रोखण्यासाठी एक विशेष पोलीस पथक तयार करण्यात आले होते. हे पथक रात्रगस्तीदरम्यान चंदनापुरी-सावरगावतळ रोडवर एक चॉकलेटी रंगाचा टिप्पर (क्रमांक चक १७ उ ०४००) संशयितरित्या फिरताना आढळून आला. तपासणीअंती या टिप्परमधून अवैधरित्या गौण खनिज वाळू वाहतूक होत असल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी टिप्पर चालक अजिज अकबर शेख (वय ३४, रा. रायते, ता. संगमनेर) यास ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याविरुद्ध गु.र.क्र. ४७७/२०२५ अन्वये कलम ३०३(२) बी.एन.एस., तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम ३ व १५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यामध्ये पोलीस निरीक्षक देविदास ढुमणे यांच्यासह पोहेकॉ. आरवडे, पोहेकॉ. उगले, पो.शि. चव्हाण, पो.शि. उगले आणि पो.शि. कोकणे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

# हगवणे आत्महत्याप्रकरणी ११ आरोपींविरोधात १६७० पानांचे दोषारोपपत्र दाखल

**पुणे (प्रतिनिधी)–** पुण्यात आणि राज्यात प्रचंड खळबळ उडवून देणाऱ्या वैष्णवी शशांक हगवणे आत्महत्या प्रकरणात एक महत्त्वाची घडामोड समोर आली आहे. हुंड्यासाठी मानसिक आणि शारीरिक छळ करून वैष्णवी हगवणे हिला आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपाखाली तिच्या पतीसह सासरच्या मंडळी आणि इतर अशा एकूण अकरा आरोपींविरोधात पुणे न्यायालयात तब्बल १,६७० पानांचे सविस्तर दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. बावधन पोलिसांनी या प्रकरणात सर्व आरोपींविरोधात ठोस आणि सबळ पुरावे संकलित केल्याचा दावा केला आहे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी आलिया बागलयांच्या न्यायालयात हे दोषारोपपत्र सोमवारी (१४ जुलै २०२५) रोजी सादर करण्यात आले.

**आत्महत्या आणि छळाचे स्वरूप:**

वैष्णवी शशांक हगवणे हिने १६ मे २०२५ रोजी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली होती. तिच्या वडिलांनी, आनंद कस्पटे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, सासरी होणाऱ्या अमानुष शारीरिक आणि मानसिक छळाला कंटाळून तिने हे टोकाचे पाऊल उचलले होते. हुंड्यासाठी तिचा पती, सासू-सासरे, नणंद आणि दीर यांनी तिला क्रूर वागणूक दिली, मारहाण केली आणि जाच करून तिच्या मृत्यूला कारणीभूत ठरले.

**आरोपी कोण आहेत?**

या प्रकरणात वैष्णवीचा पती शशांक हगवणे, सासरा राजेंद्र तुकाराम हगवणे (वय ६३), सासू लता राजेंद्र हगवणे (वय ५४), नणंद करिष्मा राजेंद्र हगवणे (वय ३१) आणि दीर सुशील राजेंद्र हगवणे यांचा समावेश आहे. हे सर्व मुक्ताई गार्डनजवळ, भुकूम येथील रहिवासी आहेत. याशिवाय, वैष्णवीच्या दहा महिन्यांच्या बाळाला बेकायदा ताब्यात ठेवल्याप्रकरणी आणि तिच्या नातेवाईकांना पिस्तूल दाखवून धमकावल्याप्रकरणी निलेश चव्हाण (वय ३५, रा. कर्वेनगर) याच्यावरही आरोपपत्र दाखल झाले आहे. आत्महत्येच्या घटनेनंतर पसार झालेल्या राजेंद्र आणि सुशील हगवणे यांना आश्रय दिल्याप्रकरणी प्रीतम वीरकुमार पाटील (वय ४७, रा. कोनगोळी, ता. निपाणी, बेळगाव, कर्नाटक), मोहन ऊर्फ बंडू उत्तमराव भेगडे (वय ५९, रा. भेगडे वस्ती, वडगाव मावळ), बंडू लक्ष्मण फाटक (वय ५५, रा. भांगरवाडी, लोणावळा), अमोल विजय जाधव (वय ३५) आणि राहुल दशरथ जाधव (वय ४५, दोघे रा. पुसेगाव, ता. खटाव, सातारा) या पाच जणांचाही अकरा आरोपींमध्ये समावेश आहे.

**दोषारोपपत्र आणि पोलिसांचा दावा**

वैष्णवीच्या आत्महत्येनंतर जवळपास दोन महिन्यांनी (५८ दिवसांनी) हे १६७० पानांचे सविस्तर दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. पुणे पोलिसांनी आपल्या तपासात सर्व अकरा आरोपींविरुद्ध सबळ पुरावे गोळा केले असल्याचा दावा केला आहे. महत्त्वाचे म्हणजे, सुनावणीदरम्यान आरोपींच्या वकिलांनी वैष्णवीच्या चारित्र्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, ङ्गवैष्णवीची प्रवृत्तीच आत्महत्येची होतीफ आणि तिने अनेकदा आत्महत्येचा प्रयत्न केल्याचे तिच्या एका व्यक्तीसोबतच्या चॅटमधून दिसून येते, असा धक्कादायक दावा केला होता. मात्र, पोलिसांनी केलेल्या तपासानुसार, आरोपींच्या वकिलांनी केलेले हे दावे फोल ठरले असून आरोपींविरुद्ध ठोस पुरावे मिळाले आहेत.

पान १ वरुन

## शशिकांत शिंदे शरद पवार गटाचे...

यांनी शशिकांत शिंदे यांच्या खांद्यावर मोठी जबाबदारी टाकली आहे. मिळालेल्या संधीचे १०० टक्के सोनं करण्याचा मी प्रयत्न करेन, अशी ग्वाही शशिकांत शिंदे यांनी आपली निवड झाल्यानंतर दिली. तर एका माथाडी कामगाराचा मुलगा आपल्या पक्षाचे नेतृत्व करणार असल्याचा विशेष आनंद असल्याची प्रतिक्रिया शरद पवार यांनी व्यक्त केली आहे. हा शेवट नाही तर एका नव्या पर्वाची सुरुवात आहे, अशी भावना मावळते प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी व्यक्त केली.

जयंत पाटील यांनी प्रदेशाध्यक्ष राजीनामा दिल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून होती. मात्र राष्ट्रवादीच्या काही नेत्यांनी राजीनाम्याचे वृत्त फेटाळून लावले होते. स्वतः जयंत पाटील यांनी सोमवारी प्रसारमाध्यमांशी बोलताना आपण अजूनही प्रदेशाध्यक्ष पदावर असल्याचे स्पष्ट करताना भाजप प्रवेशाच्या बातम्या फेटाळल्या होत्या. मात्र राष्ट्रवादीच्या प्रदेश नेतृत्वात बदल होणार आणि शरद पवार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी भाकरी फिरवणार अशी चर्चा सुरूच होती आणि ती अखेर आज खरी ठरली. शरद पवार यांच्या उपस्थितीत पक्षाच्या यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये झालेल्या बैठकीत शशिकांत शिंदे यांची नवे प्रदेशाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

प्रदेशाध्यक्ष म्हणून निवड झाल्यानंतर शशिकांत शिंदे यांनी माध्यमांशी संवाद साधला. राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रदेशाध्यक्ष या नात्याने आपण राज्यातील प्रत्येक प्रश्नांना आणि अन्यायाला वाचा फोडण्याचे काम करू. तसेच पक्ष संघटना राज्यात सगळीकडे पोहोचवण्यासाठी प्रयत्न करेन. पक्षात अनेक जेष्ठ नेते असतानाही मला प्रदेशाध्यक्षपदाची संधी मिळाली. या संधीसाजे १०० टक्के सोनं करण्याचा मी प्रयत्न करणार असल्याची ग्वाहीही त्यांनी दिली. सर्वसामान्य कुटुंबातील कार्यकर्ता नेता होऊ शकतो हे आर. आर. पाटील यांच्या माध्यमातून आपल्याला पाहायला मिळाले आहे. तशा प्रकारचे काम करून सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी सरकारच्या चुकीच्या धोरणाच्या विरोधात मी कायम आवाज उठवण्याचा प्रयत्न करणार आहे. वेळ पडली तर रस्त्यावर देखील उतरण्यास मागेपुढे पाहाणार नाही. आगामी महापालिका निवडणुका पाहिल्या तर आमच्यासमोरील आव्हाने मोठी असणार आहे, असे शशिकांत शिंदे यांनी सांगितले. पुढील महिनाभरात संपूर्ण राज्यात दौरा करून पक्ष संघटना आणखी मजबूत करण्याचा आपला प्रयत्न असेल, असेही शिंदे यांनी स्पष्ट केले.

**सामान्य कार्यकर्ता प्रदेशाध्यक्ष!**

पक्षाच्या बैठकीत शशिकांत शिंदे यांच्या नियुक्तीची घोषणा करताना शरद पवार यांनी माथाडी कामगाराचा मुलगा, लिपिकाचे काम करणारा हा कार्यकर्ता राज्यात पक्षाचे नेतृत्व करणार असल्याचा विशेष आनंद असल्याचे सांगितले. जयंत पाटील यांनी अडचणीच्या काळात साथ दिली. ७ वर्षे पक्षाचे नेतृत्व केले. अहोरात्र कष्ट केले, अशी प्रशंसा पवार यांनी केली. शशिकांत शिंदे यांचे नेतृत्व माथाडी कामगारातून उभे राहिले आहे. मी पहिल्यांदा १९६५ साली मुंबईला आलो तेव्हा सांगोल्याच्या मित्रांसोबत राहत होतो. शशिकांत शिंदेंचे वडील गोदीत काम करत होते, त्यावेळी मी गोदी पहिली. प्रचंड कष्ट करणारा माथाडी कामगार जवळून बघितला. माथाडी बोर्डात काम करणाऱ्यांमध्ये शशिकांत शिंदे होते. लोकसभा निवडणुकीला सातारा कोण लढणार? असा प्रश्न आला. शशिकांत शिंदे म्हणाले मी लढतो. तुम्ही सांगितले तर लढतो. पण त्या निवडणुकीत यश आले नाही. मात्र, त्याने संघर्ष केला. सध्या संघर्षाचा काळ आहे. त्यामुळे, संघर्ष करणाऱ्या व्यक्तीला आपण संधी दिली आहे. पुढील काळात आपला पक्ष पुन्हा उभा राहील. कारण, विचाराने काम करणे ही त्यांची खासियत आहे, असा विश्वास शरद पवार यांनी व्यक्त केला.

शरद पवार यांनी आपल्या भाषणात पक्ष फोडून भाजपसोबत गेलेल्या नेत्यांना कानपिचक्या दिल्या. आपण ज्यांना शक्ती दिली ते सत्तेत सहभागी झाले. आज महाराष्ट्रात संकट आहे, आपण त्याला सामोरे जाऊया. आज एक गृहस्थ मला भेटले, टीव्हीवर एक चित्र आले. लातूरमध्ये एक शेतकरी आणि त्याची बायको नांगरत होती. त्या शेतकऱ्यावर ४० हजार रुपयांचे कर्ज आहे. त्या कार्यकर्त्याने मला सांगितलं मी ते कर्ज भरून आलो. मी म्हणालो हे का केलं? तर तो म्हणाला मी राष्ट्रवादीचा कार्यकर्ता आहे. यातून प्रेरणा घ्या. महाराष्ट्राचे दौरे करा, राज्यातील तालुका-तालुक्याची परिस्थिती समजून घ्या. लोकांमध्ये काम करा, मग कसा पक्ष उभा राहत नाही पाहूया, असा कानमंत्र शरद पवार यांनी कार्यकर्त्यांना दिला.

**हा शेवट नाही, एका नव्या पर्वाची सुरुवात आहे..!**

मावळते प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आपल्या निरोपाच्या भाषणात हा शेवट नाही, एका नव्या पर्वाची सुरुवात आहे..! ही कविता वाचून दाखवली. पूर्वी पक्षात नेत्यांच्या मुलांनाच पदे मिळाली. पण ही प्रथा मोडून काढत आम्ही मेहबूब शेख, सक्षणा सलगर, सुनील गव्हाणे अशा सामान्य घरातील तरुणांना संधी दिली. शून्यातून लोकांना उभे करून त्यांना ताकद देण्याच काम शरद पवार यांनी केले. त्यांचा सारखा काम करणारा दुसरा नेता कोणी नाही असे सांगत असतानाच मी गेल्या २५ वर्षांपासून या पक्षात काम करत आहे. शरद पवार यांचा निर्णय मी नेहमीच अंतिम मानला आहे. त्यामुळे त्यांच्यापुढे काही नाही असे म्हणत त्यांनी सर्वच चर्चांना विराम दिला.

राज्यात आज धर्मांधतेचे विष पेरले जात आहे. जगाचा पोशिंदा असणारा शेतकरी हवालदिल झाला आहे. हे सरकार दिलेला शब्द पाळण्यास असमर्थ ठरले आहे. विधानसभा निवडणूक खूप ताकदीने लढवली. पण त्यात आपल्याला पाहिजे तसे यश मिळाले नाही. या मॅचचा अंपायर आधीच फिक्स झाला होता. स्टंपला बॉल लागून विकेट गेली तरी अंपायरने नो बोल दिला, अशी टीका जयंत पाटील यांनी केली.

## भारतीय अंतराळवीर शुभांशू...

ॲक्सियम मिशन ४ अंतर्गत ते निघाले. त्यांनी स्पेसएक्सच्या फाल्कन-९ रॉकेटला जोडलेल्या ड्रॅगन कॅप्सूलमधून केनेडी स्पेस सेंटरमधून उड्डाण केले.

शुभांशू यांच्या परतण्याबद्दल पंतप्रधान मोदी म्हणाले - संपूर्ण देशासह, मी ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांचे त्यांच्या ऐतिहासिक अंतराळ प्रवासातून पृथ्वीवर परतल्याबद्दल स्वागत करतो. शुभांशू यांनी आपल्या समर्पणाने, धाडसाने अब्जावधी स्वप्नांना प्रेरणा दिली आहे. आपल्या स्वतःच्या मानवी अंतराळ उड्डाण मोहिमेच्या दिशेने हा आणखी एक मैलाचा दगड आहे.

## मैत्रेयः गुंतवणूकदार फसवणूक...

गुन्हा नोंदवला गेल्यानंतर संबंधित मालमत्ता शोधणे, तिचे मूल्यांकन करणे, जप्तीची प्रक्रिया राबवणे आणि विक्री करणे या सर्व टप्प्यांमध्ये पोलिसांना ही यंत्रणा सहकार्य करेल तसेच महाराष्ट्र संरक्षण धोका गुंतवणूकदार संरक्षण (एमपीआयडी) कायद्यांतर्गत कारवाई अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न आहे. एमपीआयडी कायद्याच्या अंतर्गत मालमत्ता जप्त करून ती लिलावात विक्रीसाठी आणता येते. मात्र या प्रक्रियेत आजवर फार कमी प्रमाणात यश मिळाले आहे. त्यामुळे या कायद्याची अंमलबजावणी अधिक प्रभावी करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उपयुक्त ठरेल, असा विश्वासही फडणवीस यांनी व्यक्त केला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या प्रकाश सोळंके, भाजपचे सुधीर मुनगंटीवार यांनी उपप्रश्न विचारले.

**घरकुल योजनेसाठी नवे सर्वेक्षण सुरू**

**मंजूर झालेली घरे ही सर्व सौरऊर्जेवर आधारित असणार**

घरकुल योजनेसाठी नव्याने सुरू झालेल्या सर्वेक्षणामध्ये सर्व पात्र नागरिकांनी नोंदणी करावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अन्य एका प्रश्नाच्या उत्तरात केले. पंतप्रधान आवास योजना आणि इतर घरकुल योजनांच्या माध्यमातून यंदा महाराष्ट्राला देशातील सर्वाधिक म्हणजे तब्बल ३० लाख घरांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. मागील सात वर्षांत १३ लाख घरे बांधली गेली असताना, एकाच वर्षात एवढा मोठा टप्पा गाठणे हे अभूतपूर्व आहे. या ३० लाख घरांपैकी २० लाखांहून अधिक प्रकरणांचे वितरण पूर्ण झाले आहे. ग्रामविकास विभागाने एकाच महिन्यात १५ लाख प्रकरणांना मंजुरी दिली आणि १० लाख लोकांना प्रथम हप्त्याचा निधी वितरित केला आहे, अशी माहितीही फडणवीस यांनी दिली.

भाजपचे आमदार संतोष दानवे यांनी विमुक्त जाती आणि भटक्या जमातींना घरकुल लाभ मिळण्यासंदर्भात प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला उत्तर देताना फडणवीस म्हणाले, पंतप्रधान आवास योजनेतील प्रतीक्षा यादी पूर्ण झाल्यानंतर केंद्र सरकारने नव्याने सर्वेक्षण करण्याची परवानगी दिली आहे. ही प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. त्यामुळे ज्यांची नावे यापूर्वी सुटली होती, त्यांनी आवर्जून नव्याने नोंदणी करावी. महसूल, ग्रामविकास मंत्री आणि जिल्हाधिकाऱ्यांची बैठक घेऊन घरकुलासाठी रेती उपलब्ध होत आहे का नाही याचा आढावा घेतला जाईल. यावर्षी मंजूर झालेली घरे ही सर्व सौरऊर्जेवर आधारित असणार आहेत. त्यासाठी राज्य सरकारकडून प्रत्येकी ५० हजार रुपये अतिरिक्त दिले जात आहेत, जेणेकरून विजेचे बिल लागणार नाही.

## शेतकऱ्यांसाठी राष्ट्रीय बाजार...

वगळून ४८ बकरा दलाल अनुज्ञाप्ती निलंबित रद्द करण्याबाबतचा खुलासा मागवला होता. त्यांच्याकडून प्राप्त झालेला खुलासा समाधानकारक नसल्याने ४८ बकरा दलालांची अनुज्ञाप्ती निलंबित करण्यात आली. अनुज्ञाप्ती निलंबित पत्रावर न्यायालयाने स्थगिती दिली असल्याने सध्या हे प्रकरण न्याय प्रविष्ट आहे. नागपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कामकाजामध्ये दोषी असलेल्या अधिकारी आणि सचिवांची चौकशी केली जाईल. प्रसंगी आवश्यकतेनुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत त्यांची चौकशी केली जाईल, असेही जयकुमार रावल यांनी सांगितले.

## बोगस अपंग गुरूजींचा होणार...

बदलीचा लाभ मिळावा, यासाठी बोगस अंपगत्वाचे दाखल सादर केल्याच्या तक्रारी जिल्हा परिषदे वाढल्या आहेत. तसेच शासन पातळीवर देखील याची दखल घेण्यात आली असली असल्याने राज्य सरकारच्या शालेय शिक्षण विभागाने याबाबतचे आदेश काढून संबंधित शिक्षकांचे प्रमाणपत्र तपासण्याचे आदेश काढले आहेत.

त्यानूसार शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी मागील पंधरवड्यात गटशिक्षणाधिकाऱ्यांना आदेश काढत संवर्ग एकमध्ये बदलीसाठी अर्ज केलेल्या शिक्षकांची पडताळणी करण्याचे आदेश काढले होते. सुरूवातील यात तालुक्याच्या ठिकाणी असणाऱ्या गटशिक्षणाधिकारी यांच्या पथकावरावर ही मोहिम सोपवण्यात आली होती. मात्र, आता स्वतंत्रपणे गटविकास अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तालुका पातळीवर टीम तयार करून त्याव्दारे बदलीसाठी अर्ज केलेले अपंग शिक्षक, घटस्फोटीत, परिक्त्या, अपंग पालकांचे संगोपन करणे अथवा पालक असणाऱ्या शिक्षकांचा घरी जावून अधिकारी पंचनामा करणार आहेत.

**अपंग प्रमाणपत्र घोटाळ्याची पुनरावृत्ती**

जिल्हा परिषदेत रुबल अग्रवाल मुख्य कार्यकारी अधिकारी असतांना जिल्ह्यातील ७७ शिक्षकांच्या अपंग प्रमाणपत्र हे बनावट असल्याचे समोर आले होते. ही घटना साधारण २०१०-११ मधील असून त्यावेळी प्रमाणे जिल्हा परिषद प्रशासनाने शिक्षकांच्या अपंग प्रमाणपत्रांची पडताळणी केल्यास पुन्हा तसाच प्रकार समोर येणार असल्याची चर्चा शिक्षकांच्या वर्तुळात सुरू आहे. यामुळे बदलीसाठी नको ते झंझट मागे लावून घेणाऱ्या शिक्षकांची आता पाचावर धारण बसली आहे.

## व्ही. एल. मुळीक झेडपीचे...

(विकास) मुळीक यांची बदलीचे आदेश मंगळवारी ग्रामविकास विभागाच्या वतीने काढण्यात आली आहेत. दरम्यान मूळचे नगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील रहिवासी असणारे लांगोरे हे गेल्या तीन वर्षापासून नगर जिल्हा परिषदेत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. स्मितभाषी आणि शांत स्वभावाचे असणारे लांगोरे यांनी जिल्हा परिषदेच्या विविध विभागांचे काम गतीमान करण्यासाठी प्रयत्न केले. येत्या ३१ तारखेला लांगोरे शासकीय सेवेतून सेवानिवृत्त होत आहेत.

## ईव्हीएम मशीनः मनुष्यबळाचा...

आराखडा सोमवारी प्रसिद्ध करण्यात आला आहे. आता या प्रारुप प्रभाग रचनेवर २१ जुलैपर्यंत हरकती मागवण्यात आल्या आहेत. दरम्यान, जिल्ह्यात नोव्हेंबर २०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत २९ लाख ७४ हजार १८ मतदार होते. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीसाठी १ जुलै २०२५ पर्यंत नोंदवलेली मतदारांची यादी ग्राह्य धरुन नियोजन करण्याची सूचना राज्य निवडणूक आयोगाने दिले आहेत. यानुसार १ जुलै रोजी जिल्ह्यात ३० लाख ६ हजार ८१६ मतदार आहेत. जिल्हा प्रशासनाकडे सध्या कंट्रोल युनिट (सीयू) ३ हजार ५९७, बॅलेट युनिट (बीयू) २ हजार १७६, मेमरी चिप्स (डीएमएम) १ हजार ६६८ उपलब्ध आहेत. यामुळे जिल्हा परिषदेच्या आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी आयोगाकडे ४७८ कंट्रोल युनिट, १,८९९ बॅलेट युनिटची मागणी कळवण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रिया राबवण्यासाठी १ गोडावूनची आवश्यकता आहे.

## बळीराजासाठी पीक स्पर्धा

संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

सर्वसाधारण आणि आदिवासी गटासाठी तालुका पातळीपासून राज्य पातळीपर्यंत ही स्पर्धा राबवण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी खरीप हंगामातील ११ व रब्बी हंगामातील ५ अशा १६ पिकांचे उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांना या स्पर्धेत सहभाग घेता येणार आहे. या पिक स्पर्धेत मूग व उडिद पिक उत्पादक शेतकऱ्यांना ३१ जुलैपर्यंत सहभागी होता येणार आहे. उर्वरित पिकांचे उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांना ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत सहभागी होता येणार असल्याचे बोराळे यांनी सांगितले. या स्पर्धेतील विजेत्या शेतकऱ्यांना तालुका पातळीवर, जिल्हा पातळीवर आणि राज्य पातळीवर स्वतंत्रपणे एक ते तीन क्रमांकाचे रोख स्वरूपातील बक्षीस देण्यात येणार आहे.